ज्ञानगंगा घरोघरी

# प्रज्ञा वार्ता

प्रमुख मार्गदर्शक
प्राचार्य डॉ.बी.एन.पवार
प्रा.विकास इंगळे
प्रा.प्रकाश जोशी
प्रा.महेंद्र इंगळे
प्रा.मनोज सोनोणे

कळमुनरी सोमवार, १४ एप्रिल २०१६ गुरुवार पृष्ठ-४

## महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शोषितांच्या उध्दारासाठी संघर्ष

अतिशय आनंदमय जगात सर्व पशु, पक्षी, प्राणी यांसह मनुष्य जातीने गुण्यागोविंदाने जगावे अशी सर्वांची निसर्गनियम कृती असावी, हे बुध्दिमान मानवाला समजलेले आहे. निसर्गाच्या सानिध्यात राहतेवेळी प्रत्येकाने स्वत:चा विकास केलेला आहे. या प्रजातिपैकी मानवानेही शारीरिक विकासासह भाषेचाही विकास केलेला आहे. परंतु स्वार्थपणामुळे मनुष्यात भेदभाव जाणीव निर्माण केलेली आहे. त्यातुनच मनुष्यांतील भावना जागृत होवुन समानतेविषयी असंतोषाची सुरूवात होते. असंतोषमुळे समनातेची गरज [illegible]

बाबासाहेबांनी शिका, संघर्ष करा व संघटीत व्हा, असा मंत्र दिलेला आहे.

मानवाने सुरू केलेली अमनावी कृती दुर करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शांततामय संघर्ष सुरू केला. जातीभेद , वर्णभेद, लिंग भेद श्रेष्ठ, कनिष्ठ, मंदिरातील प्रवेश भेद, पाण्यासाठी भेद, कार्यामधील भेद, भाषा स्वातंत्र्यामधील भेद, न्यायामधील भेद आदी भेदामुळे मानव समाजात समानतेची विचारधारा उदयास आली. समाजातील मागास, दलित, अस्पृष्य व महिलांच्या मुक्तीसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक



लेखन करण्याची गरज निर्माण झालेली आहे. सन १९२० मध्ये मुकनायक साप्ताहीकातील एका लेखात असे लिहीले की, मागासवर्गाला भारतात राजनैतीक व धार्मिक अधिकार मिळाले तरच सर्वांच्या विकासासाठी समान संधी

होते.अमरावती मंदिर प्रवेश सत्याग्रह महागड्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह आणि पुण्यातील पार्वती मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला. धार्मिक स्थळावर अस्पृश्यांना प्रवेश नाकारने हे अमानवी कृती आहे. महिलांना प्रवेश न देणे ही एक शोकांतिका झाली आहे. देवाला त्यांच्या समोर कोण उभे आहे हे त्यांनाही दिसत नाही. परंतु ज्यांना डोळे आहे असे काही जण प्रवेशासाठी विरोध करतात. देवाच्या दर्शनासाठी आंदोलन करावे

राहील. मानव जातीत बंधुता राहील. अशा चार खांबांची डॉ.आंबेडकरांनी आखणी केलली आहे. कोणत्याही एका समाजाचा बाबासाहेबानी विचार केलेला नाही वैश्विक समाजारचनेचा विचार केलेला आहे.महाड येथील परिषदेमध्ये ३ हजार महिलांना सांगितले की, तुम्ही अर्धवट जीवन जगण्यापेक्षा या जगण्याला नवीन दिशा दिली पाहिजे. प्रथा परंपरा व रूढी यात बदल करून नवीन जीवनाची सुरूवात केली पाहिजे. स्वच्छ कपडे, निटके वस्त्र, जेवणाची पध्दत, आचार विचार व उचारात बदल करून चांगल्या व सुधारीत समाजाची निर्मिती करण्याची जवाबदारी सर्वांवर आलेली आहे. याच दरम्यान रायगड

समानतेची भूमिका नसली की अन्याय सुरू होतो. संघर्षाची जाणीव निर्माण केल्याशिवाय समानतेची विजारधारा सुरू होत नाही. या सुत्रातील वाक्य एकमेकांशी साखळीतील कडीप्रमाणे आहे. सृजन व समाजशील मानवाला वरील सुत्र निर्माण का करावे लागले. याचा विचार लोलवर करणे गरजेचे आहे.

निसर्गाने मानवाला गरजा देतांना कोणताही भेदभाव केला नाही. सुर्य सर्वांना प्रकाश देतो, पावसाचे पाणी सर्व मानवाला मिळत असते. हवेने कधी ऑक्सीजन देण्याचा भेद केला नाही तर नदी सुध्दा पाण्यासाठी भेद करीत नाही. मनुष्य हा निसर्गाचा एक घटक असल्यामुळे या मनुष्याने मनुष्यात भेदभाव करण्याचा अधिकार नसतांना सुध्दा लिंग,वंश, जात या मध्ये भेदभाव केल्याचे दिसून येते. निसर्गाचे आम्ही एक घटक आहोत. त्यामुळे सर्व समान असायला हवे, परंतु मी त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ ही भावना निर्माण झाली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मानव जातीकडून अनेक अनुभव मिळाल्यामुळे दलित, मागास किंवा मानसासारखे जगण्यापासून वंचित असणाऱ्यांसाठी गृंथातुन प्रकट विचार देवुन समाज परिवर्तनाला दिला दिलेली आहे. मासिके, पाक्षिके यातुन अनेक लेख प्रसिध्द करून अस्पृष्यची व्यथा मांडलीच नाही तर त्या निराकरणाची व्यवस्था निर्माण करून दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक बंदमुख समाजाला बोलते केले. त्यामुळे सध्यस्थीतीत भारताचा विकास त्यामुळेच झालेला आहे. समाजातील व्यक्तीला त्यांच्या गुलामी जाणीव केल्याशिवाय त्याला सकारात्मक जीवन जगण्याची उर्मी निर्माण होत नाही. त्यामुळेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचे लागण समाजात जड झाल्याने मागास व्यक्तीच्या जिवनातील अनेक घटना या समाज परिवर्तनाच्या दिशा ठरल्या आहेत.सन १९१९ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी द् टाईम्स ऑफ इंडिया मध्ये महार या मथळ्याखाली लेखन करून स्वयंशासनासाठी जेवढा ब्राम्हणाचा जन्मसिध्द हक्क आहे. तेवढाच महार यांचाही आहे. असे लेखन केल्यामुळे दडपलेला व शोषित वर्गाला वर उचलण्याचे काम केलेले आहे. असे




प्राप्त होईल, सध्या भारतात लिंग, समानतेच्या हक्काच्या मागणीसाठी महिला लढा देत आहेत.

सन १९२४ मध्ये डॉ.बाबासाहेबांनी दलित वर्गाच्या आंदोलनासाठी बहिस्कृत हितकारिणी सभा सुरू केली. ह्या संभेचा मुख्य उद्देश म्हणजे शिक्षित व्हा, संघर्ष करा, आणि संघटीत व्हा, हे मंत्रावर भर देणारा होता. दलित, शोषित व मागस व्यक्ती शिक्षित झाल्याशिवाय संघर्ष करणार नाही. आणि संघर्ष करण्यासाठी ते संघटीत होतील. त्यांना त्यांच्या अन्यायाची जाणीव निर्माण केल्याशिवाय संघर्षासाठी तो उभा राहील असा अतिशय समकालीन मौलिक विचार शोषितांना दिला. या उद्देशाच्या पुर्ततेसाठी सुरू करून दलितांच्या आर्थिक उध्दारासाठी कार्य केले. दलितांच्या समस्या ठेवुन त्यांचे प्रतिनिधीत्व केलेत ते त्यांच्या कैवारी लागते. हे बुध्दिमान मानसाला केव्हा समजेल हे कधी न मिळणारी उत्तर आहे. या उत्तरासाठी पुजाऱ्यांची, ट्रस्टची तसेच सेवकांची विचारधारा बदलण्याशिवाय शक्य नाही.

देवाच्या दर्शनासाठी जनता व शासनात भांडण होत आहे हे विकासाचे लक्षण नव्हे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड परिषद मध्ये विचार मांडते वेळी सांगितले की, आमची अयोग्यता दुर करणे एवढाच हेतु नसून सामाजिक क्रांती आणुन व मानवाच्या अडथळ्यांना नष्ट करून सर्वांना सर्वात उंच स्थानावर पोहचण्यासाठी समान संधी उपलब्ध करून देणे हा उद्देश आहे. नागरीकांच्या हक्कासाठी मानसात भेदभाव कशाला पाहिजे, याच आधारावर समाज निर्माण करण्यासाठी मनुस्मृती या ग्रंथाची सार्वजनिक दहण करून जातीभेद, श्रेष्ठ कनिष्ठ, भेद नष्ट करून समानतेची जाणीव निर्माण केलेली,आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या आवडीने कोणताही व्यवसाय करता येईल, त्याला भाष्य करण्याचे स्वातंत्र्य राहील. प्रत्येकाला न्यायाची समान संधी किल्यावर अशी घोषणा करण्यात आली की, आम्हाला जर सामाजिक क्रांतीव्दारे फायद होत नसेल तर धार्मिक क्रांती करावी लागेल. त्यामुळे सामाजीतील प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा हक्क मिळेल. ज्या धर्मात भेदभाव आहे, त्या धर्माचा तिरस्कार केला पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९५६ बौध्दा धर्माची दिक्षा घेवुन जणु दलित व अस्पृश्य समाजाचे उच्चाटन केलेले आहे. स्वतंत्र्य समता बंधुता व न्यायावर आधारलेली भारतीय लोकशाही समाज निर्माण करण्याची ताकद फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवुन दिले आहे. आम्हाला लोकशाही जीवन जगण्याची संधी निर्माण दिली हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कधीही न संपणारे उपकार आहेत. विश्वरत्न डॉ.भिमरावजी रामजी आंबेडकर या महामानवाच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांना कोटी कोटी प्रनाम वंदितो../सप्रेम जयभिम



**प्रा.डॉ.सज्जन थूल,नाशिक**

II-5.3.